महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Website: maharashatracrimetimes.com www.facebook.com/maharashtra.c.times Info@maharashtracrimetimes.com Twitter- @MHCrimeTimes Whatsapp -9803386748

मूल्य ३/- रुपये

● वर्ष : १२ ● अंक: ०७ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार १८ मे २०२१ ते सोमवार २४ मे २०२१ ● RNI. REG. NO. 105858/2010 ● POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2020-2022

## सुविचार

आपण जिथे आहात त्यापलीकडे जाण्याचा प्रयत्न करा, प्रयत्न कधीही अयशस्वी होत नाहीत.

## थोडक्यात

### ब्लॅक फंगसवरील औषधाचीही काळाबाजार सुरू; १२ हजार रुपयांपर्यंत विकले जात आहे एक इंजेक्शन

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था):** कोरोना संसर्गावरील उपचारात वापरल्या जाणाऱ्या रेमडेसिवीर व अन्य औषधांच्या काळ्या बाजारीपाठोपाठ ब्लॅक फंगस रोगावरील औषधाचीही काळाबाजार सुरू झाला आहे. कोरोना संसर्ग होऊन गेलेल्या लोकांना प्रामुख्याने ब्लॅक फंगस




म्हणजे म्युकर मायकोसिसचा सामना करावा लागत आहे. ब्लॅक फंगसवरील उपचारात कामी येणारे अम्फोटेरीसीन-बी नावाचे इंजेक्शन बाजारातून गायब झाले असून काळ्या बाजारात मात्र ते चढ्या दराने मिळत आहे. देशाच्या विविध भागात ब्लॅक फंगस रोगाचे प्रमाण वाढत आहे. एकीकडे रेमडेसिविर इंजेक्शन आणि ऑक्सीजनचा ठणठणाट असताना दुसरीकडे ब्लॅक फंगसवरील औषधे गायब होत चालली आहेत. रुग्णांच्या संकटात यामुळे जास्तच भर पडली आहे.

### 'मुंबईकरांचं जे नुकसान झालं त्यापासून कंत्राटदार आणि सत्ताधाऱ्यांना पळ काढता येणार नाही!'

**मुंबई (विशेष प्रतिनिधी)-** 'मुंबईत आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली असून पालिका कर्मचारी, अधिकारी तैनात आहेत! पण जे नुकसान मुंबईकरांचे झाले त्यापासून कंत्राटदार आणि सत्ताधाऱ्यांना पळ काढता येणार नाही!' असा इशारा भाजपा नेते आशिष शेलार यांनी दिला



आहे. तौक्ते चक्रीवादळामुळे पाणी तुंबणे, झाडे उन्मळून पडण्यासह मुंबईत निर्माण झालेली आपत्कालीन स्थिती आणि महापालिका करित असलेले मदत कार्य याबाबत महापालिकेत जाऊन पालिका आयुक्तांशी चर्चा केली व माहिती घेतली. तसेच, 'तौक्ते चक्रीवादळाने निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे मुंबईकरांचं अतोनात नुकसान झालं आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिकांशी मी स्वतः भेटून आल्यानंतर व मुंबईत झालेल्या प्रवासानंतर हे लक्षात आलं आहे की, अनेक ठिकाणी मोठ्याप्रमाणावर पडलेली झाडं व वाहनांचं झालेलं नुकसान, अनेक झोपड्यांची छतं उडून गेली आणि या नुकसानाबरोबरच अनेक ठिकाणी पाणी देखील तुंबलेलं दिसून आलं आहे.



# तौक्ते चक्रीवादळाने घेतला रौद्रावतार

## तुफान पावसानं मुंबईला झोडपलं; मुंबई विमानतळ आणि वांद्रे-वरळी सी लिंक बंद

**मुंबई (योगेश होळंब)-** अरबी समुद्रात कमी दाबाच्या पट्ट्यामुळे निर्माण झालेल्या आणि गुजरातकडे मार्गक्रमण करणाऱ्या तौक्ते चक्रीवादळाने अतिरौद्रवतार धारण केला आहे. रविवारपासून चक्रीवादळाचं स्वरूप तीव्र होताना दिसत असून, हवामान विभागाने दिलेल्या ताज्या माहितीनुसार चक्रीवादळाने अतिरौद्र रूप धारण केले असून, वेगवान होत ते गुजरात किनारपट्टीच्या दिशेने निघाले आहे. वादळामुळे ताशी १८० ते १९० किमी वेगाने वारे वाहणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. वादळामुळे मुंबईसह शेजारील जिल्ह्यांमध्ये वादळी पाऊस सुरू आहे. केरळ, तामिळनाडू, गोवा किनारपट्टी ओलांडून तौक्ते चक्रीवादळ गुजरातच्या दिशेनं हळूहळू सरकू लागलं आहे. वादळाचा वेग ताशी २० किमी असून, वाऱ्याचा वेग प्रचंड वाढला आहे. वादळाच्या सद्यस्थितीबद्दल आणि पुढील काही तासांतील बदलामुळे हवामाने विभागाने माहिती प्रसिद्ध केली आहे. दीव किनारपट्टीसह गुजरातला रेड अलर्ट देण्यात आला आहे. सध्या चक्रीवादळाचं स्वरूप बदललं असून, वादळाने अतिरौद्र रुप धारण केलं आहे. याचा परिणाम मुंबई, ठाणे, पालघर, रायगड पुणे, या जिल्ह्यांमध्येही दिसून येत आहे. (शेष पृष्ठ २ वर)

## सिंधुदुर्गला सर्वाधिक फटका, रस्ते बंद, बत्ती गुल, नेटवर्क गायब!

तौक्ते चक्रीवादळाचा सर्वाधिक फटका सिंधुदुर्ग जिल्ह्याला बसल्याचं पाहायला मिळत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील महामार्ग, मुख्य रस्ते आणि रेल्वे सेवा बंद आहे. वादळामुळे जवळपास ८० टक्के विजेचे खांब कोसळले आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील वीज सेवा खंडीत झाली आहे. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यातील मोबाईल टॉवरही कोसलळे आहेत. त्यामुळे मोबाईल सेवाही विस्कळीत झाल्याचं पाहायला मिळतंय. अशावेळी प्रशासनाने आधीच खबरदारी घेत कोरोना रुग्णांसाठी योग्य उपाययोजना केल्याचं दिसून आलं आहे. चक्रीवादळाचा इशारा आधीच मिळाल्यामुळे प्रशासनाने कोविड रुग्णांसाठी योग्य ती खबरदारी घेतली होती. वीज गेली तर कोरोना रुग्णांच्या जीवितास धोका होऊ नये यासाठी कोविड रुग्णालयांमध्ये जनरेटरची सुविधा करण्यात आली होती. त्यामुळे वादळाच्या तडाख्यात बत्ती गुल झाली असली तरी



कोरोना रुग्णालयातील वीज सुरु आहे.

देवडच्या समुद्र किनाऱ्यावर नांगरुन ठेवलेली एक बोट वाहून गेल्याची घटना घडलीय. या बोटीत ७ जण होते. वादळामुळे आलेल्या लाटेत ही बोट समुद्रात वाहून गेली. बोटीतील तिघे पोहून किनाऱ्यावर परत आले. मात्र, एकाचा मृतदेह आढळून आला आहे. तर अन्य तिन जणांचा शोध अद्याप लागलेला नाही. एनडीआरएफ आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून त्यांचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरु आहेत. दुसरीकडे रत्नागिरी जिल्ह्यात एका ठिकाणी भिंत कोसळून १० मोटरसायकलचं मोठं नुकसान झाल्याची माहिती मिळतेय.

रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगडच्या समुद्र किनाऱ्यांवरील नागरिकांचं मोठ्या प्रमाणात स्थलांतर करणयात आलंय. तीन जिल्ह्यात मिळून एकूण १२ हजार ४२० नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्यात आल असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागानं दिली आहे.

## रायगडमध्ये हजारो घरांचं नुकसान, ८,५०० नागरिक स्थलांतरित, २ महिलांचा मृत्यू

तौक्ते चक्रीवादळानं कोकणातील समुद्र किनाऱ्यावर अक्षरशः थैमान घातल्याचं पाहायला मिळतंय. रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात नुकसान झालंय. शेकडो झाडं कोसळली आहेत. हजारो घरांचं नुकसान झालंय. तर चक्रीवादळाच्या तडाख्यात २ महिलांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, दुपारी ४ वाजता रायगडच्या समुद्र किनाऱ्यावर ४ मीटरपर्यंत लाटा उसळण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आलाय. ताशी ५० ते ६० किलोमीटर प्रति तास वेगाने वारे वाहत आहेत. त्यामुळे रायगडमध्ये तौक्ते चक्रीवादळानं मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचं आता समोर येत आहे.

उरण परिसरात एक भिंत पडून दोन महिलांचा मृत्यू झाल्याची घटना समोर आलीय.



उरणच्या बाजारपेठेत भिंत पडल्यानं भाजी विक्री करणारी महिला निता भालचंद्र नाईक आणि सुनंदाबाई भालचंद्र घरत यांचा मृत्यू झाला आहे. तर ८०० पेक्षा जास्त घरांना आणि पत्र्याच्या शेडचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. १७ ठिकाणी झाडं उन्मळून पडल्यानं महामार्ग बंद झालेत. पडलेली झाडं बाजूला करुन रस्ते वाहतूक सुरळीत करण्याचं काम सुरु आहे. श्रीवर्धन आणि मुरुड तालुक्यात कालपासून वीज प्रवाह खंडीत झालाय. तर रोहा, महाड आणि अलिबागमध्ये काही ठिकाणी वीज प्रवाह खंडीत करण्यात आलाय. रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगडच्या समुद्र किनाऱ्यांवरील नागरिकांचं मोठ्या प्रमाणात स्थलांतर करण्यात आलंय.

## कोरोनाचं संकट कायम, अजून आणखी लाटा येणार, भारतासाठी ६-१८ महिने चिंतेचे; WHOच्या शास्त्रज्ञाचा इशारा

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा)-** भारतात कोरोनाची तिसरी लाट येण्याची शक्यता वर्तवण्यात येत असतानाच भारतीयांच्या चिंतेत भर टाकणारी नवी बातमी आली आहे. भारतात कोरोनाच्या आणखी बऱ्याच लाटा येण्याची शक्यता असून भारतासाठी ६ ते १८ महिने अत्यंत महत्त्वाचे असल्याचं जागतिक आरोग्य संघटनेच्या एका शास्त्रज्ञाने सांगितलं आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मुख्य शास्त्रज्ञ डॉ. सौम्या स्वामिनाथन यांनी द हिंदू या दैनिकाला दिलेल्या मुलाखतीत ही शक्यता वर्तवली आहे. येणाऱ्या काळात भारतात कोरोनाच्या अनेक लाटा येऊ शकतात. त्यामुळे भारताच्या



अडचणी वाढू शकतात. कोरोनाच्या लढाईत पुढील ६ ते १८ महिने भारतासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत, असं सौम्या यांनी सांगितलं. या व्हायरसचा विकास कसा होतो, त्यावरही बरच काही अवलंबून आहे. व्हेरिएंटसच्या विरोधात व्हॅक्सिनची क्षमता आणि व्हॅक्सिनमुळे होणारी इम्युनिटी किती काळ लोकांचा बचाव करेल, हे खूप महत्त्वाचे राहणार आहे. यात बरंच काही बदलत आहे, असं सौम्या म्हणाल्या.

कोरोना संसर्गाचा निश्चितच अंत होईल. २०२१च्या अखेरपर्यंत कोरोनाचा अंत झालेला आपण पाहू शकू. जगातील ३० टक्के लोकांचं लसीकरण झालं आहे. त्यामुळे मृत्यूचं प्रमाणही कमी होणार आहे, असं सांगतानाच २०२२नंतर लसीकरणाला मोठ्या प्रमाणावर वेग येणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. कोरोनाच्या संकटातून आपण सर्वजण जात आहोत. हा कठिण काळ आहे. आपल्याला पुढील ६ ते १२ महिन्याच्या कामगिरीवर लक्ष ठेवावं लागेल. हा काळ परीक्षेचा असू शकतो. त्यानंतर संक्रमणावर नियंत्रण ठेवण्यासाठी दीर्घ योजना आखावी लागणार आहे.

## वर्गीकरण करून रुग्णांवर उपचार करा!

**मुंबई (राजेश गायकवाड)-** लक्षणांनुसार रुग्णांचे योग्य वर्गीकरण झाल्यास वेळेत योग्य उपचार करणे शक्य होते. अनाठायी, अनावश्यक उपचार करू नका आणि करोनातून बरे झालेल्या रुग्णांवरही बारकाईने लक्ष ठेवा, असा सल्ला 'माझा डॉक्टर' या



उपक्रमात कृतिदलाच्या तज्ज्ञांनी डॉक्टरांना दिला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या 'माझा डॉक्टर' संकल्पनेतून रविवारी राज्यभरातील डॉक्टरांसाठी दूरचित्रसंवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कृतिदलाचे प्रमुख डॉ. संजय ओक, डॉ. राहुल पंडित, डॉ. शशांक जोशी, वैद्यकीय शिक्षण विभागाचे संचालक डॉ. तात्याराव लहाने आणि कान, नाक, घसा तज्ज्ञ डॉ. आशिष भूमकर यांनी राज्यातील सुमारे २२ हजार फॅमिली फिजिशियन आणि वैद्यकीय चिकित्सकांना मार्गदर्शन केले.

'रुग्ण प्रथम त्यांच्या डॉक्टरकडे (फॅमिली डॉक्टर) जातात. रुग्णांना करोनासदृश्य कोणतीही लक्षणे असल्यास तातडीने 'आरटीपीसीआर' चाचणी करून घेणे गरजेचे आहे. सिटी स्कॅनमध्ये फुफ्फुसांवर परिणाम झाल्याचे दिसत असले तरी संसर्गाची तीव्रता धोकादायक आहे असे नाही. त्यामुळे सिटीस्कॅन ही निदान करणारी चाचणी नाही. 'आरटीपीसीआर'ला पर्याय नाही. गृहविलगीकरणातील रुग्णांवर उपचार करताना डॉक्टरांनी नियमितपणे फोन किंवा व्हिडिओच्या माध्यमातून संवाद साधावा, अशी सूचना डॉ. ओक यांनी केली. तसेच रुग्णाला पहिल्या आठवड्यात फारसा त्रास होत नाही, परंतु दुसऱ्या आठवड्यात त्याची लक्षणे तीव्र होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे डॉक्टरांनी गृहविलगीकरणातील रुग्णांवर देखरेख ठेवणे गरजेचे आहे', असे डॉ. ओक यांनी सांगितले.

(शेष पृष्ठ २ वर)

## काँग्रेस खासदार राजीव सातव यांना अखेरचा निरोप, हिंगोलीत अंत्यसंस्कार

**हिंगोली (विशेष प्रतिनिधी)-** काँग्रेसचे सरचिटणीस व राज्यसभा खासदार राजीव सातव यांचे पुण्यात उपचारादरम्यान रविवारी पहाटे निधन झाले. राजीव सातव यांच्या निधनामुळे काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. एक तरुण, आश्वासक नेता अकाली गेल्यामुळे सार्वत्रिक हळहळ व्यक्त होत आहे. सातव यांच्यावर सोमवारी सकाळी मसोड (ता. कळमनुरी, जि. हिंगोली) येथे अंत्यसंस्कार झाले.

राजीव सातव यांच्या मुळगावी त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठी कार्यकर्ते व राजकीय नेत्यांनीही हजेरी लावली होती. सातव यांच्या निधनाने हिंगोलीतील अनेक कार्यकर्त्यांना अश्रू अनावर झाले होते. राजीव सातव यांना १९ एप्रिलपासून करोनाची लक्षणे जाणवत होती. २२ एप्रिलला त्यांच्या करोनाच्या चाचणीचा अहवाल 'पॉझिटिव्ह' आल्याचे त्यांनी स्वतःच 'ट्वीट'द्वारे जाहीर केले होते. त्यानंतर पुण्यात जहांगीर रुग्णालयात त्यांच्यावर २३ एप्रिलपासून उपचार सुरू होते. २८ एप्रिलला त्यांना 'व्हेंटिलेटर'वर ठेवण्यात आले होते. मुंबईतील वैद्यकीय तज्ज्ञांचे पथकही पुण्यात त्यांच्या



उपचारासाठी आले होते. त्यांना मुंबईला रुग्णालयात हलविण्याचे प्रयत्न काँग्रेसजनांकडून सुरू होते. मात्र, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने हलविण्यात आले नाही. उपचारांदरम्यान नऊ मे रोजी त्यांच्या चाचणीचा अहवाल 'निगेटिव्ह' आल्याने ते करोनामुक्त झाले. मात्र, दीर्घ आजारामुळे त्यांना न्यूमोनियाचा संसर्ग झाल्याने गुंतागुंत वाढली आणि विविध अवयवयांना संसर्ग होऊन रविवारी पहाटे चार वाजून ५८ मिनिटांनी त्यांची प्राणज्योत मालवली.

## फडणवीस आणि माझ्याएवढा कोणताही नेता कोरोना काळात फिरला नसेल -चंद्रकांत पाटील

**पुणे (अभिजीत येरल्लू)-** कोरोनाच्या संकटकाळात महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक फिरुन काम करणाऱ्यांमध्ये स्वत:चा आणि विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांचा समावेश असल्याचा उल्लेख भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी केला आहे. पाटील यांनी पुण्यामध्ये पत्रकारांशी संवाद साधताना विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस आणि माझ्याएवढे काम कोरोनाच्या संपूर्ण संकटकाळात राज्यातील इतर कोणत्याच नेत्याने केले नसल्याचे आहे. कोरोनाच्या कालावधीमध्ये आम्ही सतत




फिरत आहोत. आमच्या दोघांएवढा कोणताही नेता फिरला नसेल, असे पाटील यांनी म्हटले आहे. तसेच कोरोनाच्या कालावधीमध्ये भाजपचे खासदार आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी कार्यकर्त्यांना दिलेला इशारा हा प्रेमळ सल्ला असल्याचेही पाटील म्हणाले आहेत. आम्हा सर्वांचे नितीनजी पालक आहेत.

## राहुल गांधी म्हणतात; 'पीएम केअरचे व्हेंटिलेटर आणि खुद्द पीएम यांच्यात अनेक समानता'

**नवी दिल्ली (हिंदुस्थान समाचार)-** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पीएम केअरमधील बंद असलेल्या व्हेंटिलेटरवरून पीएम मोदींवर



टीका केली. अनेक ठिकाणी पीएम केअरमधून खरेदी करण्यात आलेले व्हेंटिलेटर काम करत नसल्याने धूळ खात पडले आहेत. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दोन दिवसांपूर्वीच त्यांचे ऑडिट करण्याचे आदेश दिले होते. यावरुन राहुल गांधी यांनी अप्रत्यक्षरित्या पंतप्रधानांवर टीका केली. त्यांनी नरेंद्र मोदी आणि पीएम केअर मधून आणलेले व्हेंटिलेटर्स यांची तुलना करत दोघांचाही खोटा गाजावाजा झाला असल्याचे म्हटले.

## मराठा आरक्षण आंदोलनाला भाजपचा पाठिंबा

**मुंबई (जसबीरकौर भामरा)-** मराठा समाजाला पुन्हा आरक्षण मिळावे यासाठी समाजातर्फे होणाऱ्या आंदोलनाला संपूर्ण पाठिंबा असून पक्षाचे नेते व कार्यकर्ते त्यात सहभागी होतील, अशी घोषणा प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी येथे केली. मराठा आरक्षणासाठी त्यांच्या अध्यक्षतेखाली पक्षाची उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. भाजपच्या समितीमध्ये विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर,



प्रदेश सरचिटणीस श्रीकांत भारतीय, आमदार आशीष शेलार, शिवसंग्रामचे नेते विनायक मेटे आणि अण्णासाहेब पाटील महामंडळाचे माजी अध्यक्ष नरेंद्र पाटील यांचा समावेश आहे. समितीची पहिली बैठक रविवारी मुंबईत झाली.

# राज्यात ७३० खाटांची ८ कोरोना रुग्णालये सुरू; कृषी उत्पन्न बाजार समितीचा पुढाकार

**मुंबई (योगेश होळंब)-** कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी राज्यात ७३० खाटांची ८ कोरोना रुग्णालये सुरू केली असून, आणखी तीन ठिकाणी २०० खाटांची रुग्णालये सुरू होत आहेत. पणन संचालक सतीश सोनी यांनी ही माहिती दिली. २२ कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी, कोविड सेंटर सुरू करण्याविषयी तयारी दर्शवल्याचेही त्यांनी सांगितले. पारोळा, अहमदनगर, शेवगाव, बार्शी, मानवत, जिंतूर, सेलू आणि परभणी या आठ ठिकाणी रुग्णालये सुरू झाली आहेत. परळी, संगमनेर, श्रीरामपूर या तीन ठिकाणी २०० खाटांची रुग्णालये लवकरच सुरू होत असल्याचेही ते म्हणाले. खामगाव आणि भिवंडी या दोन बाजार समित्यांनी वैद्यकीय साहित्यासाठी २५ लाख रुपये दिले आहेत. राज्यामध्ये कोविडमुळे गंभीर परिस्थिती उद्भवली



असून सर्वत्र रुग्णसंख्या प्रचंड वाढल्याने कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी विलगीकरण कक्ष, ऑक्सिजन बेड सुविधा उपलब्ध करून देणे, सॅच्युरेटेड ऑक्सिजन पुरवठा करावयाच्या मशिनचा पुरवठा करणे तसेच कोविडच्या उपचारांची निगडीत सुविधा उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शविली असून त्याची सुरुवातही केली आहे. बाजार समित्यांनी कोविड केअर सेंटरसाठी जागा उपलब्ध करून देणे, रुग्णांसाठी बेडची व्यवस्था, चहा-नाष्टा, जेवण, कोविड केअर सेंटरला बेड, ऑक्सिजन सिलिंडर पुरवठा आदींबाबत बाजार समित्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार सतत आढावा घेतला जात आहे. राज्यामध्ये ३०६ कृषी उत्पन्न बाजार समित्या आहेत. त्यांनी कोविड सेंटरची उभारणी करावी, असे आवाहन पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांनी केले होते. बाजार समित्यांनी पणन संचालकांकडे सरप्लस रकमेतून खर्चाची परवानगी मागितली होती. दहा लाखांवर सरप्लस असलेल्या १३७ बाजार समित्या असून, त्यांनी कोविड सेंटर सुरू करणे तसेच इतर कोविड सेंटरला अनुषंगिक सुविधा उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शविली.

# पावसाळ्यापूर्वीची कामे मे महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य

**मुंबई (दिपेश गोरिवले):** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - कल्याण, कल्याण - कर्जत, दक्षिण पूर्व घाट, कर्जत - पनवेल सेक्शनमध्ये सुरू असलेल्या विविध कामांची मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक आलोक कंसल यांनी पाहणी केली. त्यावेळी मान्सूनपूर्व कार्याचा वेग वाढविण्यासाठी सांगत त्यांनी पावसाळ्यापूर्वीची सर्व कामे मे महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य दिले. या पाहणी दौऱ्यावेळी मध्य रेल्वेचे मुंबई विभागीय रेल्वे व्यवस्थापक शलभ गोयल आणि अधिकारी उपस्थित होते.

कंसल यांनी मुंबई विभागातील उपनगरीय आणि घाट



विभागातील सुरक्षेचे निरीक्षण केले. त्यांनी मान्सूनपूर्व तयारी आणि प्रवासी सुविधांशी संबंधित कामांचा आढावासुद्धा घेतला. त्यांनी यंत्रणेतील सुधारणेच्या मूळ कारणांचे विश्लेषण करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. कंसल यांनी विभागांतील विविध सेक्शनमध्ये विनावापर रेल्वे रुळाचा कुठलाही तुकडा पडलेला असू नये म्हणून मोहीम सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. पावसाळापूर्व कार्याचा वेग वाढविण्यासाठी सांगत सर्व पावसाळ्यापूर्वीची कामे मे महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य त्यांनी दिले. निरीक्षणादरम्यान, त्यांनी फिल्डमधील कर्मचाऱ्यांना नियमित आणि मान्सूनपूर्व कर्तव्यांबाबत जागरूक राहण्याच्या सूचना दिल्या. विभागीय अधिकाऱ्यांना नियमितपणे पाणीपुरवठ्याची गुणवत्ता तपासण्यासाठी, पादचारी पूल आणि उड्डाणपूल यांचे सुरक्षा ऑडिट करण्यास सांगितले आणि फिल्डमधील व कार्यालयांतील कर्मचाऱ्यांच्या लसीकरणाची चौकशी केली आणि कर्मचाऱ्यांना लस मिळावी, यासाठी प्रत्येक शक्यता तपासून घेण्यास सांगितले.

# कोरोनाने अडवली आंब्याची परदेशातील वाट: निर्यातीत ४० टक्क्यांची घट

**मुंबई (नितीन देवळेकर)-** कोरोनाने आंब्याची परदेशात जाण्याची वाट अडवली आहे. आंतरराष्ट्रीय प्रवासावरील निर्बंधांमुळे विमान उड्डाणांची संख्या कमी झाल्याने त्याचा परिणाम आंब्याच्या निर्यातीवर झाला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा आंब्याच्या निर्यातीत जवळपास ४० टक्क्यांची घट नोंदविण्यात आल्याची माहिती मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीतील



व्यापाऱ्यांनी दिली. महाराष्ट्रातून हवाई आणि जलमार्गे आंब्याची निर्यात होते. त्यातही जलद वाहतुकीसाठी हवाई मार्गाचा प्रामुख्याने अवलंब केला जातो. एअर कार्गो सुविधेचे दर चढे असल्याने प्रवासी विमानांद्वारे आंबा निर्यात करण्यावर व्यापारी भर देतात. प्रवासी विमाने पार्सलसाठी राखीव असलेल्या जागेतून आंब्याचे वहन करतात. भारतात कोरोनाने शिरकाव केल्यानंतर विमान प्रवासावर निर्बंध लागू करण्यात आल्याने आंतरराष्ट्रीय प्रवाशांची संख्या जवळपास ९० टक्क्यांनी घटली आहे. परिणामी विमानफेऱ्यांच्या संख्येवरही परिणाम झाल्याने आंब्याच्या निर्यातीत अडथळे येत आहेत. गेल्या वर्षी प्रवासी विमानांच्या साहाय्याने ४९,६५९ मेट्रिक टन आंबा निर्यात करण्यात आला. त्यातून जवळपास ४ हजार कोटी रुपये उत्पन्न मिळाले. परंतु, यंदा विमान प्रवासावरील निर्बंधांमुळे आतापर्यंत केवळ ३० हजार मेट्रिक टन आंबा निर्यात करता आला. त्यामुळे उत्पन्न २ हजार ३०० कोटी रुपयांवर स्थिरावल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. जलवाहतुकीद्वारे आंब्याची निर्यात वाढविण्यासाठी अनुकूल स्थिती निर्माण करा, सुविधा वाढवा, अशा सूचना सरकारला केल्या होत्या. त्याची वेळीच अंमलबजावणी झाली असती तर हवाई वाहतुकीवरील अवलंबित्व संपले असते आणि सध्या शेतकरी आणि व्यापाऱ्यांचे होत असलेले नुकसान टाळता आले असते.

आंब्याच्या निर्यातीसाठी प्रवासी विमानांवर अवलंबून राहावे लागते, कारण एअर कार्गो सुविधेचे दर हे तिप्पट आहेत. यंदा प्रवासी विमानांच्या फेऱ्या कमी झाल्याने त्याचा सर्वाधिक फटका आंब्याच्या निर्यातीला बसला.

# मुंबईत एक लाख लाभार्थी दुसऱ्या डोसच्या प्रतीक्षेत

**मुंबई (सम्यक कासारे):** लसीच्या तुटवड्यामुळे राज्यात १८ ते ४४ वयोगटातील लाभार्थ्यांचे लसीकरण बंद करण्यात आले. त्यानंतर या लसींचा वापर करून दुसऱ्या डोसच्या प्रतीक्षेत असणाऱ्यांचे लसीकरण करण्यात येईल, अशी माहिती आरोग्य विभागाने दिली. सध्या राज्यात २० लाख



तर मुंबईत १ लाख लाभार्थी दुसऱ्या डोसच्या प्रतीक्षेत आहे. नुकतेच केंद्रीय आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार कोविशिल्ड घेतलेल्या लाभार्थ्यांचा दुसऱ्या डोसचा कालावधी ६-८ आठवड्यांवरून १२-१६ आठवड्यांनंतर करण्यात आला आहे, यामुळे लाभार्थ्यांना काही दिलासा मिळाला आहे. मुंबईत शुक्रवारी २३ हजार ९२४ हजार लाभार्थ्यांना लस देण्यात आली. त्यात ११ हजार ३५३ लाभार्थ्यांना पहिला तर १२ हजार ५७१ लाभार्थ्यांना दुसरा डोस देण्यात आला. आतापर्यंत एकूण २८ लाख ४१ हजार ३४९ लाभार्थ्यांना लस देण्यात आली. त्यात २१ लाख २१ हजार ५७३ लाभार्थ्यांना पहिला तर ७ लाख १९ हजार ७७६ लाभार्थ्यांना दुसरा डोस देण्यात आला. आतापर्यंत एकूण २ लाख ९८ हजार ७६२ आरोग्य कर्मचारी, ३ लाख ५६ हजार ०९८ फ्रंटलाइन वर्कर्स, ११ लाख ३३ हजार ६२८ ज्येष्ठ नागरिक, ४५ ते ५९ वयोगटातील गंभीर आजार व इतर १० लाख ४ हजार १११, तर १८ ते ४४ वयोगटातील ४८ हजार ७५० लाभार्थ्यांना लस देण्यात आली.

# रुग्णवाहिकांसाठी प्रमाणित भाड्यापेक्षा अधिक आकारणी केल्यास कारवाई

**मुंबई (विशाल कारंडे)-** करोनाकाळात रुग्णवाहिका सेवा देताना अव्वाच्या सव्वा दर आकारले जात आहेत. त्याविरोधात तक्रारी येत असल्याने रुग्णवाहिकांसाठी योग्य व निश्चित केलेले भाडेदर आकारा, अन्यथा कारवाई के ली जाईल असा इशारा परिवहन विभागाने दिला आहे. विभागाने निश्चित केलेले दरपत्रकही रुग्णवाहिकांना लावण्याचा उपक्रम राज्यात आरटीओकडून राबविला जात आहे. रुग्णवाहिकांच्या विविध प्रकारांनुसार २५ किलोमीटर




किं वा त्यापेक्षा अधिक, तसेच दोन तासांच्या वापराकरिता किं वा प्रतिकिलोमीटर दराने भाडे निश्चित के लेले आहे. परंतु सध्या रुग्णवाहिका चालक, मालक निश्चित के लेल्या भाडेदरांपेक्षा जास्त दर आकारणी करुन रुग्णांच्या नातेवाईकांना लुबाडत असल्याचे राज्यातील काही भागांत दिसून येत आहे. अशांवर कारवाई करण्याचा इशारा परिवहन विभागाने दिला आहे. जे वाहन चालक, मालक जास्त भाडेदर आकारणी करतील, त्यांची तक्रार आल्यास अशांवर दंडात्मक कारवाई केली जाईल किंवा गुन्हा दाखल के ला जाणार आहे. पहिल्या गुन्ह्यात ५ हजारांपर्यंत, दुसऱ्या गुन्ह्यात दहा हजारांपर्यंत दंड आकारला जाईल. तिसऱ्यांदा गुन्हा केल्यास आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात येणार असल्याची माहिती परिवहन विभागाकडून देण्यात आली.

# औषधांसाठी करावी लागते थेट मुंबईवारी; राज्यात म्युकरमायकोसिस इंजेक्शनची काळाबाजारी

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)-** राज्यात म्युकरमायकोसिस या आजाराचे रुग्ण विविध जिल्ह्यांत आढळून येत असून, या रुग्णांना लागणाऱ्या इंजेक्शनचा मोठा तुटवडा जाणवू लागला आहे. इंजेक्शन मिळत



नसल्याने बाहेरच्या जिल्ह्यांत शोधाशोध करावी लागत असून, उपचारासाठी इतर जिल्ह्यांत धाव घ्यावी लागत आहे. या इंजेक्शनचा काळाबाजार रोखण्याची मागणी रुग्णांच्या नातेवाइकांनी केली आहे. अहमदनगर जिल्ह्यात म्युकरमायकोसिस आजाराचे २५ रुग्ण आढळून आले आहेत. या रुग्णांना लागणारे इंजेक्शन नगरमध्ये मिळत नसल्याने रुग्णांच्या नातेवाइकांची इंजेक्शनसाठी मोठी धावाधाव होत आहे. काही रुग्णांनी उपचारासाठी पुणे, ठाणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद येथे धाव घेतली आहे. सध्या जिल्ह्यात प्रत्येक दिवशी १०० ते १२५ इंजेक्शनची गरज लागत आहे. औरंगाबाद, परभणी, जालना जिल्ह्यात या आजारावरील उपचारासाठी लागणारे इंजेक्शन उपलब्ध नसल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. इंजेक्शनची आवश्यकता लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने इंजेक्शनची मागणी कंपन्यांकडे नोंदविली आहे. बीड जिल्ह्यात उपचारासाठी लागणारे इंजेक्शन सरकारी रुग्णालयात उपलब्ध नाहीत. खासगी औषध वितरकांनी इंजेक्शनची मागणी केली आहे, परंतु त्यांनाही अजून मिळाली नाहीत, अशी माहिती औषध निरीक्षक रामेश्वर डोईफोडे यांनी दिली. साताऱ्यातील म्युकरमायकोसिसच्या रुग्णांचा आकडा १२ च्या पुढे गेला आहे. यावर उपचारासाठी वापरल्या जाणाऱ्या इंजेक्शनचा तुटवडा असल्यामुळे त्याच्या शोधार्थ नातेवाइकांना मुंबईची वारी करावी लागत आहे.

# लशीअभावी उच्च शिक्षणासाठी परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे भवितव्य अधांतरी!

**मुंबई (अलीहूसेन शेख)-** महाराष्ट्रासह संपूर्ण देशातून उच्च शिक्षणासाठी परदेशी जाऊ इच्छिणाऱ्या लाखो मुलांचे भवितव्य त्यांना वेळेत लस न मिळाल्यास अधांतरी राहण्याची भीती निर्माण झाली आहे. परिणामी आपल्या पाल्याचे प्राधान्याने लसीकरण करावे, अशी मागणी परदेशी विद्यापीठात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या हजारो पालकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय आरोग्यमंत्री हर्ष वर्धन यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

देशातील लस उत्पादन, त्यातून निर्माण झालेला गोंधळ तसेच १८ ते ४५ वर्षे वयोगटातील नागरिकांना करोना लस मिळण्यातील अडचणी या पार्श्वभूमीवर परदेशातील विविध विद्यापीठांत आपल्या गुणवत्तेवर प्रवेश मिळालेले लाखो विद्यार्थी वेळेत लस न मिळाल्यास प्रवेशाला मुकतील, अशी भीती आता निर्माण झाली आहे. करोना, टाळेबंदीमुळे गेल्या वर्षी खूपच कमी विद्यार्थी शिक्षणासाठी परदेशी जाऊ शकले.

गेल्या वर्षी जाऊ न शकलेले तसेच नव्याने जाऊ इच्छिणारे विद्यार्थी



यंदा ऑगस्टमध्ये परदेशी शिक्षणासाठी जाण्याच्या तयारीत आहेत. ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत हे विद्यार्थी तेथे पोहोचणे अपेक्षित असते. मात्र, केंद्र सरकारच्या धोरणानुसार ॲपमध्ये नोंद नसेल तर लसीकरण होणार नाही आणि लशीच्या दोन मात्रा ऑगस्टपूर्वी मिळाल्या नाहीत तर हे विद्यार्थी शिक्षणासाठी परदेशी जाऊ शकणार नाहीत. परिणामी विद्यार्थी व त्यांचे पालक अस्वस्थ झाले आहेत. यातील अनेक पालकांनी मुलांसाठी शैक्षणिक कर्जही घेतले आहे. या विद्यार्थ्यांचे तातडीने लसीकरण केले जावे, असे साकडे हजारो पालकांनी पंतप्रधान व केंद्रीय आरोग्यमंत्र्यांना घातले आहे. महाराष्ट्रातील अनेक मुलांच्या पालकांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनाही पत्राद्वारे लस मिळण्यासाठी विनंती केली आहे. 'मुंबई ग्राहक पंचायत'चे कार्याध्यक्ष शिरीष देशपांडे यांनीही मुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे विनंती करून या मुलांना जुलैपूर्वी लस देण्याची मागणी केली आहे. भाजपचे खासदार विनय सहस्त्राबुद्धे व आमदार आशीष शेलार हेही या विद्यार्थ्यांच्या लसीकरणासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करीत आहेत.

# 'स्मशानभूमी परिसरातील प्रदूषण नियंत्रणासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करा'

**मुंबई (जसबीरकौर भामरा)-** करोनामुळे निर्माण झालेली स्थिती आणि मृत्युंचे वाढते प्रमाण लक्षात घेता मृतदेहांची विल्हेवाट लावण्यासाठी, तसेच स्मशानभूमी परिसरातील हवेचे प्रदूषण कमी करण्याकरिता पालिकांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उपाययोजना कराव्यात, अशी सूचना उच्च न्यायालयाने गुरुवारी केली. करोनाच्या दुसऱ्या लाटेत मृत्युचे प्रमाण वाढले आहे. पुण्यातील काही स्मशानभूमींमध्ये सध्या एकाच दिवशी ८० हून अधिक मृतदेहांवर अंत्यसंस्कार केले जात आहेत. राज्यातील अन्य स्मशानभूमींमध्ये कमी-अधिक प्रमाणात हीच स्थिती आहे. वैकुंठ स्मशानभूमीतील विद्युतदाहिनीवरील चिमणीची उंची कमी आहे. त्यातच सततच्या अत्यंसंस्कारांमुळे वाढत असलेल्या धुराच्या लोटामुळे स्मशानभूमी परिसरात प्रदूषणासोबतच राखही पसरत आहे. परिणामी स्मशानभूमीच्या परिसरातील लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. स्मशानभूमीतील अवैज्ञानिक व्यवस्थापनामुळे उद्भवत असलेल्या स्थितीचा मुद्दा विक्रांत लाटकर यांनी ॲड्. असीम सरोदे व ॲड्. अजिंक्य उडाणे यांच्यामार्फत जनहित याचिका करून न्यायालयाच्या निदर्शनास आणला आहे. मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर गुरुवारी सुनावणी झाली. त्या वेळी अनेक स्मशामभूमींच्या चिमण्या या कमी उंचीच्या असून मृतदेह जाळल्याने त्यातून बाहेर पडणारा धूर आसपासच्या परिसरातच पसरतो आणि त्यामुळे संपूर्ण परिसरात हवेच्या प्रदूषणाची



समस्या निर्माण झाली आहे, असे याचिकाकर्त्यांच्या वतीने न्यायालयाला सांगण्यात आले. न्यायालयाने त्याची दखल घेत पुणे पालिकेचे वकील अभिजीत कुलकर्णी यांना या प्रकरणी उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले. त्याच वेळी सध्याच्या स्थितीचा विचार करता स्मशानभूमी अधिक प्रभावीप्रमाणे कार्यान्वित असण्याची गरज न्यायालयाने बोलून दाखवली. किंबहुना सगळ्या पालिकांनी स्मशानभूमीतील अंत्यसंस्कांमुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी कोणत्या अत्याधुनिक तंत्रज्ञानता वापर करता येतील याचा विचार करायला हवा, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

# कोरोनाच्या धास्तीने मुंबईकरांची 'विमानवारी'ला नापसंती

**मुंबई (विशाल पाटील)-** प्रवाशांची वर्दळ, विमानांची लगबग आणि सतत कानावर पडणाऱ्या सूचनांनी गजबजून जाणारे मुंबई विमानतळ सध्या चिरनीद्र अवस्थेत असल्यासारखे भासत आहे. मे महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात येथील दैनंदिन प्रवासी संख्येत कमालीची घट झाली आहे. त्यामुळे कोरोनाच्या भीतीने मुंबईकर विमानवारीला नापसंती दर्शवित आहेत की काय, अशी शंका विमान कंपन्यांकडून व्यक्त केली जात आहे. कोरोनाआधी मुंबई विमानतळावरून दिवसाला सरासरी १ लाख ४० हजार प्रवासी प्रवास करायचे. मात्र, गेल्या मार्च महिन्यात हवाई वाहतुकीवर निर्बंध लागू केल्यापासून प्रवासी संख्येचा आलेख घसरणीला लागला आहे. मे (२०२१) महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात येथील दैनंदिन प्रवासी संख्या सरासरी १७ हजार ६०० इतकी नोंदविण्यात आली आहे. कोरोनापूर्वकाळाचा विचार करता ही घट जवळपास ९० टक्के इतकी आहे. जानेवारी २०२१ मध्ये मुंबई विमानतळावरील दैनंदिन प्रवासी संख्या सरासरी ५५ हजार ८०० इतकी नोंदविण्यात आली होती. फेब्रुवारीत ६३ हजार ५००, मार्च ५० हजार ९०० आणि एप्रिलमध्ये दिवसाला सरासरी ३४ हजार ६०० प्रवाशांनी येथून प्रवास केला. चालू वर्षाची आकडेवारी पाहता जानेवारीच्या तुलनेत मे महिन्यात मुंबई विमानतळावरील प्रवाशांची वर्दळ जवळपास ६८.४५ टक्क्यांनी कमी झाली आहे.

# '३५ हजार कोटींमध्ये तुम्ही फक्त ४० टक्के लोकांनाच लस देणार का?' केंद्र सरकारला रोहित पवारांचा खडा सवाल!

**मुंबई (राकेश गायकवाड)-** करोना काळामध्ये देशाच्या अनेक भागांमध्ये लसींचा अपुरा पुरवठा होत असल्याच्या तक्रारी येऊ लागल्या आहेत. त्यासोबतच, केंद्र सरकारने १ मे पासून १८ ते ४४ वयोगटातल्या नागरिकांसाठी लसीकरणाच्या तिसऱ्या



टप्प्याची घोषणा केल्यामुळे लसींच्या तुटवड्याचा मोठा पेच राज्य सरकारांसमोर निर्माण झाला आहे. केंद्र सरकारच्या याच लसीकरणाच्या धोरणावर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी सडकून टीका केली आहे. लोकसत्ता डॉट कॉमला दिलेल्या विशेष मुलाखतीमध्ये रोहित पवार यांनी राजकीय मुद्यांसोबतच सध्याच्या परिस्थितीत सुरु असलेल्या लसीकरणाच्या मुद्यावर रोखठोक भूमिका मांडली. 'अर्थसंकल्पात लसीकरणासाठी जाहीर केलेल्या ३५ हजार कोटींमध्ये फक्त ४० टक्के लोकांनाच लस देणार का?' असा सवाल त्यांनी केंद्र सरकारला विचारला आहे. यावेळी रोहित पवार यांनी केंद्र सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केला. 'राज्य आणि केंद्र सरकारमध्ये नक्कीच समन्वयाचा अभाव आहे. राज्य सरकार अशाच गोष्टींची मागणी करतं ज्या केंद्राकडे आहेत. लसीकरण, लसीचं नियोजन, उत्पादन, वितरण केंद्राकडे आहे. केंद्र सरकारने अर्थसंकल्पात ३५ हजार कोटी रुपये लसींसाठी आरक्षित केले आहेत. त्यातून केंद्र सरकार १०० कोटी लोकांना दोन्ही लसी देऊ शकतं. पण मग ते म्हणाले की १८ ते ४४ वयोगटातल्या लोकांसाठी राज्यांनी लसीकरण करावं. पण ६० टक्के लोकं त्याच वयोगटातले आहेत. म्हणजे त्याचा अर्थ ७५ ते ८० कोटी हीच लोकसंख्या झाली.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग**
**प्रशासकीय इमारत, १ला मजला, भवन्स कॉलेज जवळ,**
**दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८**
Email : northmumbai.ee@mahapwd.com **दूरध्वनी क्रमांक ०२२-२६२३१९६४ फॅक्स- २६२०५७८८**
**ई निविदा सूचना क्र. ३ सन २०२१-२२**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग, मुंबई (दूरध्वनी/फॅक्स क्र. २६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य त्या खात्याकडून नोंदणीकृत मुंबई उपनगर जिल्हा (पश्चिम उपनगरे) मजूर सहकारी संस्था मर्यादित, मुंबई, यांच्याकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहोत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. स्तंभ ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अर्जदार मजूर संस्था ज्या उपनगरातील संबंधित असेल त्याच उपनगरातील कामासाठी अर्ज करू शकतात.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | उपनगरे |
|---|---|---|---|
| १ | विशेष दुरुस्ती अंतर्गत सशस्त्र पोलीस दलामधील कँटींग बॅरेक मरोल पोलीस कॅम्प मरोळ, अंधेरी (पूर्व), येथे छताची व पाईप लाईनची दुरुस्ती करणे. | रु. ६०६५६६/- | **पश्चिम उपनगरे** |
| २ | विशेष दुरुस्ती अंतर्गत सशस्त्र पोलीस दलामधील डीसीपी ऑफीस बॅरेक, मरोळ पोलीस कॅम्प मरोळ, अंधेरी (पू), येथे दरवाजे खिडक्यांची दुरुस्ती करणे, रंगकाम, जोते संरक्षण व ड्रेनेज लाईनची दुरुस्ती करणे | रु. १०८१५७९/- | **पश्चिम उपनगरे** |
| ३ | विशेष दुरुस्ती अंतर्गत सशस्त्र पोलीस दलामधील शाळा बराकी, एम.टी. बॅरेक मरोळ पोलीस कॅम्प मरोळ, अंधेरी (पू) येथे छताची व पाईप लाईनची दुरुस्ती करणे. | रु. ६९६८५८/- | **पश्चिम उपनगरे** |
| ४ | विशेष दुरुस्ती अंतर्गत सशस्त्र पोलीस दलामधील डीसीपी ऑफिस बॅरेक, मरोळ पोलीस कॅम्प मरोळ, अंधेरी (पू) येथे छताची व पिण्याच्या पाईप लाईनची दुरुस्ती करणे. | रु. ७३५४०५/- | **पश्चिम उपनगरे** |
| ५ | विशेष दुरुस्ती अंतर्गत ४०० पोलीस निवास्थानातील अ, ब, क टाईपच्या इमारती मरोळ पोलीस कॅम्प मरोळ, अंधेरी (पू), येथे ड्रेनेज लाईनची दुरुस्ती करणे | रु. ९०२८६६/- | **पश्चिम उपनगरे** |
| ६ | विशेष दुरुस्ती अंतर्गत इंद्रायणी वसतीगृह, नालंदा इमारत (६ खोल्या) पोलीस प्रशिक्षण केंद्र मरोळ, सशस्त्र पोलीस दलामधील डी.सी.पी. ऑफिस बॅरेक मरोळ पोलीस कॅम्प मरोळ, अंधेरी (पू) येथे फरशी, छताची व पाईप लाईनची दुरुस्ती करणे.. | रु. ९८९६४३/- | **पश्चिम उपनगरे** |
| ७ | विशेष दुरुस्ती अंतर्गत इंद्रायणी वसतीगृह, नालंदा इमारत (६ खोल्या) पोलीस प्रशिक्षण केंद्र मरोळ, सशस्त्र पोलीस दलामधील डी.सी.पी. ऑफिस बॅरेक मरोळ पोलीस कॅम्प मरोळ, अंधेरी (पू) येथे गिलावा व रंगकाम व इतर स्थापत्य कामे करणे. | रु. ५७३१५८/- | **पश्चिम उपनगरे** |
| ८ | विशेष दुरुस्ती अंतर्गत ६०० पोलीस निवासस्थानातील इमारत क्र. ई-३, ई-४, ई-५, ई-६ (तळ मजला ते तिसरा मजला) मरोळ पोलीस कॅम्प मरोळ, अंधेरी (पू) येथे गिलावा रंगकाम करणे (२० रूम) | रु. ९९९७१३/- | **पश्चिम उपनगरे** |
| ७ | विशेष दुरुस्ती अंतर्गत ६०० पोलीस निवासस्थानातील इमारत क्र. ई-१०, ई-१४, ई-१५ (तळ मजला ते तिसरा मजला) मरोळ पोलीस कॅम्प मरोळ, अंधेरी (पू) येथे गिलावा रंगकाम करणे (२० रूम) | रु. १००१७९०/- | **पश्चिम उपनगरे** |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग, अंधेरी (प.) मुंबई-५८ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**ई-निविदा उपलब्ध कालावधी दि. १३/०५/२०२१ ते २०/०५/२०२१ पर्यंत**
**ई-निविदा उघडणे दि. २१/०५/२०२१**
जा.क्र. काअ/उमुंवि/निविदा/३००६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग, प्रशासकीय इमारत, १ला मजला
भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई मार्ग अंधेरी (प.), मुंबई- ५८
दिनांक : ७/०५/२०२१

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग करिता
अंधेरी (प.), मुंबई- ५८

**डीजीआयपीआर/२०२१-२०२२/४४८**



# ‘ही’ बाब चघळत न बसता निर्णय घेतला, संजय राऊतांकडून भाजप मुख्यमंत्र्यांचं कौतुक

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)- शिवसेनेचं मुखपत्र असलेल्या सामना या वृत्तपत्रातून भाजप नेते आणि मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यावर कौतुकाचा वर्षाव करण्यात आलाय. नेहमीच भाजपावर टीका करण्यात येणाऱ्या सामनाच्या अग्रलेखातून मध्य प्रदेशातीलभाजपा सरकारने घेतलेल्या निर्णयाचं स्वागत करत, अभिनंदन करण्यात आलंय.**

अनाथ मुलांना दरमहा ५ हजार रुपये देण्याचा निर्णय शिवराजसिंह चौहान यांनी घेतला आहे. कोरोना महामारीच्या काळात दुर्दैवी घटनेतून अनाथ होण्याची वेळ आलेल्या बालकांसाठी हा निर्णय दिलासादायक आहे. त्यामुळेच, शिवसेनेनं अग्रलेखातून भाजपा नेत्याचं कौतुक केलंय. देशात रोज साडेतीन लाखांवर कोरोना रुग्णांची संख्या वाढत आहे. त्यातही लहान मुलांच्या अनाथपणाचे संकट ही कोरोना काळातील भयंकर आपत्ती आहे. या सर्व अनाथ मुलांच्या भविष्याचा विचार पालक म्हणून सरकारलाच करावा लागेल. सरकार केंद्राचे असो नाहीतर राज्यांचे, अशा मृत पालकांची व त्यांच्या निराधार मुलांची नोंद ठेवावी लागेल. या मुलांना आधी जगवावे लागेल. त्यांना आधार द्यावाच लागेल. त्यांना मानवतेची कवचकुंडले द्यावीच लागतील, जी मध्य प्रदेशच्या शिवराजसिंह चौहान यांनी देण्याचा प्रयत्न केला आहे. लोकांना जगायचे आहे, जे जगले नाहीत, ज्यांना राज्यकर्ते वाचवू शकले नाहीत त्यांच्या निराधार मुलांना आधार द्यावाच लागेल. हे सर्व करण्यासाठी सामाजिक संस्था पुढाकार घेतीलच, पण राज्यकर्ते अनाथ मुलांसाठी काय करू शकतात ते मध्य प्रदेशच्या सरकारने दाखवले आहे. शिवराजसिंह चौहान यांचे आभार! अशा शब्दात नेहमी केंद्र सरकार आणि भाजपा नेत्यांवर टीका करण्यात येत असलेल्या सामनाच्या अग्रलेखातून भाजप नेते आणि मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांचं कौतुक केलंय. कोरोनामुळे अनाथ झालेल्या मुलांना दरमहिना पाच हजार रुपये पेन्शन देण्याचा निर्णय मध्य प्रदेश सरकारने घेतला आहे. या माणुसकीने ओथंबलेल्या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान व त्यांच्या सरकारचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच. देशात कोरोनाचे संकट अतिभयंकर स्थितीत पोहोचले आहे. कोरोना कुणालाच सोडत नाही. मुले, वृद्ध, तरुण, महिला अशा प्रत्येकालाच या राक्षसाचा विळखा पडला आहे. कोरोनामुळे माता-पित्यांना म्हणजे पालकांनाही प्राण गमवावे लागल्याने त्यांच्या लहान मुलांचे जगणे निराधार झाले.

# पाण्याचा जलद गतीने निचरा होण्यासाठी प्रयत्न सुरु; मुंबईतील परिस्थितीचा महापौरांनी घेतला आढावा

**मुंबई (सम्यक कासारे)-** तौत्के चक्रीवादळामुळे वाहत असलेले वेगवान वारे व सुरु असलेला मुसळधार पाऊस लक्षात घेता, मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर यांनी आज दिनांक १७ मे २०२१ रोजी गेट वे ऑफ इंडियापासून चौपाटीच्या पाहणीला प्रारंभ करून मुंबईतील एकंदरीत जनजीवनाचा आढावा घेतला. महापौर किशोरी पेडणेकर यांनी गेट वे ऑफ इंडिया, गिरगाव, वरळी सी- फेस, दादर या चौपाट्यांची पाहणी करून बृहन्मुंबई महापालिकेने समुद्र किनाऱ्यांवर केलेल्या तयारीचा आढावा घेतला. तसेच मुंबईकर नागरिकांनी अत्यावश्यक कामाव्यतिरिक्त घराबाहेर पडू नये, असे आवाहन केले. महापौर किशोरी पेडणेकर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना



म्हणाल्या की, जोरदार वाऱ्यामुळे काही ठिकाणी झाडे कोसळली असून मनुष्यहानी मात्र कुठेही झाली नाही. वृक्ष कोसळण्याच्या घटनांबाबत संबंधित त्या-त्या विभागाच्या सहाय्यक आयुक्तांना भ्रमणध्वनीद्वारे अवगत करीत असल्याचे महापौर म्हणाल्या. अग्निशमन दलातर्फे तातडीने वृक्ष हटविण्याचे काम सुरू आहे. तसेच काही किरकोळ ठिकाणी घराच्या भिंती कोसळल्या आहे. एनडीआरएफच्या टीम ठीकठिकाणी तैनात करण्यात आल्या असून पोलीस गस्त घालून वाहतूक सुरळीत करीत आहे. पाणी वाहून नेणाऱ्या पर्जन्य जलवाहिन्यांच्या पातमुखांवर महापालिका कर्मचारी तैनात करण्यात आले असून पाण्याचा जलद गतीने निचरा होण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचे महापौरांनी सांगितले.

# एक तर त्यांना सोडा नाहीतर मलाही अटक करा :ममता बनर्जी

**कोलकाता (अकिल शेख)–** ममता बॅनर्जी यांच्या मंत्रिमंडळातील फिरहाद हाकिम, सुब्रत मुखर्जी यांना नारदा घोटाळ्यात सीबीआयने अटक केली आहे. यामुळे पश्चिम बंगालमधील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले आहे. दरम्यान, आज (दि. १७) सकाळीच या प्रकरणात एक आमदार आणि माजी मंत्री शोभन चटर्जी यांनाही सीबीआयच्या कार्यालयात



नेण्यात आले होते. मात्र, अटक केलेल्या हाकिम आणि मुखर्जी यांना सीबीआयच्या ऑफिसमध्ये नेण्यापूर्वीच स्वतः मुख्यमंत्री ममता बॅनर्जी सीबीआय ऑफिसमध्ये पोहोचल्या. यावेळी ममता यांनी तेथेच आंदोलनाला सुरूवात केली. तसेच त्यांनी, जोपर्यंत आपल्या सहकाऱ्यांना सोडण्यात येत नाही किंवा आपल्यालाही अटक होत नाही. तोपर्यंत सीबीआय कार्यालय सोडणार नाही, असे म्हटले आहे. मंत्रिमंडळातील फिरहाद हाकिम, सुब्रत मुखर्जी यांना नारदा घोटाळ्यात सीबीआयने अटक होताच ममता बॅनर्जी निजाम पॅलेसच्या १५ व्या मजल्यापर्यंत पोहोचल्या. जिथे सीबीआयचे अँटी करप्शन सेल कार्यालय आहे. त्यानंतर ममता यांनी आपल्या चार नेत्यांच्या अटकेच्या निषेधार्थ सीबीआय कार्यालयात आंदोलनाल सुरू केले आहे. तसेच त्यांनी, जोपर्यंत आपल्या सहकाऱ्यांना सोडण्यात येत नाही किंवा आपल्यालाही अटक होत नाही. तोपर्यंत सीबीआय कार्यालय सोडणार नाही, असे सांगितल्याचे त्यांचे प्रवक्ते तथा वकील अनिंद्यो राऊत यांनी पत्रकारांना सांगितले.

दरम्यान, यापूर्वी राज्याचे राज्यपाल जगदीप धनखड यांनी सीबीआयला फिरहाद हाकिम यांच्यासहीत सुब्रत मुखर्जी, मदन मित्रा आणि सोवन चटर्जी यांच्या विरोधातील कारवाईला मंजुरी दिली होती. त्यावेळी हाकिम म्हणाले होते की, ‘आमचा विश्वास आहे की आम्हाला क्लीन चीट मिळेल. मी न्यायालयावर विश्वास ठेवतो. हे प्रकरण न्यायालयात गेले, ही चांगली गोष्ट आहे. मी तिथे माझी बाजू मांडेन आणि मला न्याय नक्की मिळेल’, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

२०१४ साली नारदा घोटाळा समोर आलेला होता. तेव्हा पत्रकार मॅथ्यू सॅम्युल यांनी कोलकात्यात स्टिंग ऑपरेशन केले होते. त्यानंतर हा घोटाळा माध्यमांसमोर आला. या व्हिडीओमध्ये तृणमूल काँग्रेसचे अनेक नेते रक्कम घेताना दिसून आले होते. याशिवाय एक पोलिस अधिकारीदेखील रक्कम घेताना दिसून आला होता.

# भारताने लशीच्या दोन डोसमधील अंतर का वाढवलं?

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा)-** वर्षभरापूर्वी देशात शिरकाव केलेल्या कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव अद्यापही कमी झालेला नाही. करोनाचा संक्रमणाचा प्रसार रोखण्यासाठी नागरिकांचं लसीकरण करण्यावर भर देण्याची उपाय वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांकडून दिला जात आहे. केंद्र आणि राज्य सरकारांनीही लसीकरण मोहिमेला जोर दिला असतानाच केंद्राने कोविशिल्ड लसींच्या दोन डोसमधील अंतर वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे दोन डोसमधील अंतर वाढवण्यावरून प्रश्नही उपस्थित केले जात आहे. करोनाचा फटका बसलेल्या युकेमध्ये दोन लसींमधील अंतर कमी करण्यात आलेलं असताना भारताने हे अंतर का वाढवलं? अशी चर्चा सध्या सोशल मीडियावर होत आहे.



युकेमध्ये पहिला डोस घेतल्यानंतर १२ आठवड्यानंतर दुसरा डोस दिला जात होता. मात्र, आता ते अंतर कमी करुन ८ आठवड्यांवर आणलं आहे. देशातील अधिकाधिक लोकांचं लसीकरण करण्याच्या दृष्टीने दोन डोसमधील अंतर वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. जेणेकरून नागरिकांना कमीत कमी एका डोसचं संरक्षण मिळण्यासाठी हा निर्णय घेलला होता. ब्रिटनच्या मुख्य वैद्यकीय प्राध्यापक ख्रिस व्हिट्टी यांनी सांगितलं. आता करोनाच्या बी.१.६१७ या नव्या स्ट्रेनमुळे करोनाचा उद्रेक होत असून, हा धोका लक्षात घेऊन ब्रिटनने दोन्ही डोसमधील अंतर कमी करण्याचा निर्णय आता घेतला आहे. परंतु, कोरोनाचं सावट असतानादेखील भारताने मात्र, दोन लसीकरणांमधील का वाढवलं या नव्या चर्चांना उधाण आलं आहे. कोविशिल्डच्या पहिल्या व दुसऱ्या डोसमध्ये जर जास्त अंतर असेल, तर मधला काळ हा अँटीबॉडीज तयार होण्यासाठी जास्त प्रभावी ठरु शकतो. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचं केंद्र सरकारने या निर्णयाची माहिती देताना म्हटलेलं आहे.

# लसीकरणामुळे तिसरी लाट रोखता येणार, कोरोनाला रोखण्यासाठी सुविधांची निर्मिती

**कळंबोली (शकिल शेख)–** पनवेल महापालिका क्षेत्रात सिडको वसाहतीसह २९ महसुली गावांचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार पालिका आरोग्य विभागाकडून कोरोना संसर्ग रोखण्यासाठी कंबर कसली आहे. त्याचबरोबर पनवेल ग्रामीण भागातदेखील कोरोना रुग्णांची संख्या घटत असून, नवीन रुग्णांची संख्या आटोक्यात आली आहे. कोरोनाची दुसरी लाट काही अंशी ओसरत असल्याचे चित्र आहे. जिल्हा आरोग्य प्रशासन आणि महापालिका आरोग्य विभागाकडून पनवेल तालुक्यात येणाऱ्या तिसऱ्या लाटेला रोखण्याचा निर्धार केला आहे. त्यानुसार यापुढे वैद्यकीय उपचार आणि लसीकरणावर भर देणार आहे. फेब्रुवारी महिन्यापासून कोरोनाच्या दुसऱ्या लाटेला सुरुवात झाली. मार्च आणि एप्रिल महिन्यांत कोरोनाबाधित रुग्णांच्या संख्येत अचानक वाढ झाली; तर मृत्यूचे प्रमाणदेखील वाढले होते.

यंदा कोरोनाची दुसरी लाट खूप हानिकारक ठरली. त्यात वैद्यकीय सेवा अपुरी तसेच लसीकरणाचा तुटवडा भासल्याने अनेक कोरोना रुग्णांचे मोठे हाल झाले. मोठ्या प्रमाणात रुग्ण आढळत असल्याने पनवेल पालिका क्षेत्रात बेडची कमतरता भासू लागली होती. त्यानुसार पनवेल पालिकासह तालुक्यातील नागरिकांसाठी वैद्यकीय सुविधा वाढवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. यासाठी जिल्हा प्रशासनाकडूनही साथ मिळाली आहे. त्याचबरोबर रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांनी चांगलेच लक्ष दिले आहे.

# हे तर ग्रहणांचेही बाप; चक्रीवादळावरून नितेश राणे यांचा ठाकरे सरकारवर टीकास्त्र

**मुंबई (विशाल पाटील)-** मुंबई, कोकण किनारपट्टीसह महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांना तौत्के चक्रीवादळाचा फटका बसला. अजूनही चक्रीवादळ मुंबईजवळील समुद्रात घोंगावत असून, अद्याप धोका टळलेला नसल्याचं सांगण्यात येत आहे. ऐन करोना संकटातच चक्रीवादळाचा तडाखा बसला आहे. निसर्ग चक्रीवादळानंतर आलेल्या तौत्के चक्रीवादळावरून



आमदार नितेश राणे यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकारवर टीकास्त्र डागलं आहे. गोव्यानंतर रविवारी सायंकाळी महाराष्ट्राच्या किनारपट्टी भागात तौत्के चक्रीवादळाने पाऊल ठेवलं. रात्रीपासून अद्याप चक्रीवादळ महाराष्ट्राच्या किनारपट्टी भागातून संथ गतीने गुजरातच्या दिशेनं जात आहे. या चक्रीवादळामुळे कोकण किनारपट्टीसह मुंबई आणि राज्याच्या इतर भागात पडझड झाली आहे. गेल्या वर्षीही देश आणि महाराष्ट्र करोना संकटाचा मुकाबला करत असतानाच निसर्ग चक्रीवादळाचा तडाखा बसला होता. करोनाचा उद्रेक झालेला असताना सलग दुसऱ्या वर्षी आलेल्या चक्रीवादळाला नितेश राणे यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना जबाबदार ठरवलं आहे. नितेश राणे यांनी ट्विट केलं आहे. ‘उद्धव ठाकरे सरकारची महाराष्ट्रातील दोन वर्षष्ठ २०२० चक्रीवादळ (निसर्ग चक्रीवादळ), २०२१ चक्रीवादळ. २०२० आणि २०२१मध्ये करोनाबळींमध्ये पहिल्या क्रमांकावर. हे पुढे सुरूच आहे. सगळं वाईटच घडत आहे.

# लोक मरताहेत, तरीही नियम पायदळी, जिल्ह्यात लॉकडाऊन असतानाही बाजारांत गर्दी

**पालघर (विशेष प्रतिनिधी)-** लसीकरण मोहिमेला नावे ठेवणारे अनेक लोक आता कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने, त्याची झळ आपल्याला लागू नये, म्हणून लसीकरणाच्या रांगेत मोठी गर्दी करू लागले आहेत, तर दुसरीकडे कोरोनामुळे लोक मरत असतानाही अनेक जण बाजारात गर्दी करताना दिसून येत आहेत. दरम्यान, जिल्ह्यात कोरोनाबाधितांची एकूण संख्या ९९ हजार १३५ झाली असून, १ हजार ७८० बाधितांचा कोरोनाने मृत्यू झाला आहे. सध्या १५ हजार ६१७ जणांना कोरोनाची बाधा झाल्याने, त्यांच्यावर रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. जिल्ह्यात १३ मार्चपासून साथरोग प्रतिबंधात्मक कायदा लागू करण्यात आला असून, १५ मेपर्यंत मनाई आदेश जाहीर करण्यात आलेला आहे. त्यामुळे पोलीस अधीक्षकांच्या आदेशान्वये जिल्ह्यातील सर्व पोलीस



ठाण्यांतर्गत कडक अंमलबजावणी सुरू आहे, तरीही काही लोक मेडिकल, हॉस्पिटल, अत्यावश्यक बाबींच्या नावावर बाहेर पडत असल्याचे दिसून येत आहे.

जिल्ह्याच्या शहरी भागात लॉकडाऊनचा चांगला परिणाम दिसून येत असला, तरी ग्रामीण भागाच्या बाजारपेठा, दुकाने सुरू असल्याने महिलांची गर्दी काही भागांत होत आहे. पोलिसांनी सकाळी ७ ते ११ अशी बाजारपेठा आणि दुकाने सुरू ठेवण्याचे जाहीर केले असले, तरी काही भागात संध्याकाळीही बाजारात गर्दी केली जात असल्याचे दिसून येत आहे.

# महाराष्ट्रातील प्रमुख लेण्या

नाशिक येथे असणाऱ्या पांडवलेण्यांमुळे ‘लेण’ हा शब्द आला. त्यापासूनच लेणी हा शब्द रूढ झाला. लेणी म्हणजे डोंगरातील दगडांवर केलेले कोरीव काम होय. लेणी निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारा एकसंध व कणखर



स्वरूपाचा दगड महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. महाराष्ट्रात बौद्ध, जैन, हिंदू या धर्माच्या-पंथांच्या विविध लेणी एकत्र किंवा वेगवेगळ्या स्वरूपात बघायला मिळतात. केवळ भारतातच नाही तर संपूर्ण जगात प्रसिद्ध असणाऱ्या अजिंठा-वेरूळ येथील लेणी या महाराष्ट्रात आहेत. या लेण्या म्हणजे महाराष्ट्राचे वैभवच आहेत. इ.स.पू. दुसरे शतक ते इ.स. आठवे शतक या काळात औरंगाबादमधील अजिंठा आणि वेरुळ येथे या लेणी निर्माण करण्यात आल्या.

**अजिंठा:** अजिंठ्याच्या एकूण ३० लेणींपैकी काही लेणी खूपच अप्रतिम आहेत. सह्याद्री पर्वताजवळ वसलेल्या अजिंठा गावाच्या वायव्येस एका डोंगरात अजिंठा लेणी कोरलेली आहे. या डोंगररांगेतील बेसॉल्ट जातीचा एकसंघ दगड या लेणी निर्माण करण्यासाठी खूप उपयोगी ठरला आहे. एकूण ३० गुहांचा समावेश असणाऱ्या या लेणीत हीनयान व महायान अशा दोन बौद्धधर्मीय लेणींचा समावेश होतो. इ.स. ६०२ ते इ. स. ६६४ या काळात युआॅन श्वाँग हा चिनी प्रवासी बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठी भारतात आला होता. त्याने अजिंठ्याच्या लेणीला भेट दिल्याचा उल्लेख इतिहासात सापडत नसला, तरी त्याने या लेणींविषयी जे लिहून ठेवले आहे, त्यावरून या लेणींच्या तत्कालीन वैभवाची आपल्याला कल्पना करता येऊ शकते.

**वेरूळ:** अजिंठा येथील लेणी ज्या चित्रकला व शिल्पकला यांमुळे जगप्रसिद्ध आहेत त्याच कारणांमुळे वेरूळ येथील लेणीदेखील प्रसिद्ध असून, त्यास मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी मिळाली ती येथील ‘आधी कळस मग पाया’ ही नवी म्हण निर्माण करणाऱ्या ‘कैलास मंदिरामुळे.’ औरंगाबादपासून वायव्येस सुमारे २१ कि.मी. अंतरावर बालाघाटाच्या डोंगरात वेरूळच्या लेणी वसलेल्या आहेत. अहल्याबाई होळकर यांनी या कैलास लेण्यांचा जीर्णोद्धार केला.



अजिंठा-वेरूळ येथील लेणींनी जरी महाराष्ट्राचे, भारताचे नाव जगाच्या कानाकोपऱ्यात पसरवलेले असले, तरी महाराष्ट्रातील इतर छोट्या लेणींचे महत्त्वही काही कमी नाही. या छोट्या लेणीदेखील राज्य व राष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध आहेत.

**घारापुरी:** प्राचीन काळी ‘श्रीहरी’ असे नाव असलेल्या सध्याच्या घारापुरी या बेटावर शैव संप्रदायाच्या लेणी आहेत. मुंबईपासून ११ कि. मी. अंतरावर समुद्रात घारापुरी या बेटावर या लेणी आहेत. इ.स. ३ ते इ.स. ७ या काळात या लेणींची निर्मिती झाली असे मानले जाते. या लेणींमधील अकरा हात उंचीची तीन मुखे असलेली शिवाची मूर्ती जगातील भव्य आणि सुंदर अशा शिल्पांपैकी एक समजली जाते. अर्धनारीनटेश्वराची मूर्तीदेखील या ठिकाणी बघायला मिळते. पूर्वी या बेटाच्या दक्षिणेला एक मोठा दगडी हत्ती सर्वांचे लक्ष वेधून घेत असे. त्या हत्तीवरूनच या लेणींना ‘एलिफंटा केव्ह्ज’ हे नाव मिळाले. हा हत्ती सध्या मुंबईतीलच जिजामाता उद्यान (जुने नाव राणीची बाग) येथे आहे. या लेणींचादेखील ‘जागतिक वारसा’ च्या यादीमध्ये समावेश झाला



आहे.

**पांडव लेणी:** पांडव लेणी या नाशिकमध्ये ‘पांडवलेणी’ या नावानेच ओळखल्या जाणाऱ्या डोंगरावर आहेत. याच लेणीमध्ये प्रथम ‘लेण’ हा शब्द आला व त्यापासून पुढे ‘लेणी’ हा शब्द तयार झाला. यामध्ये एकूण २४ लेण्या असून त्या सर्व हीनयान पंथीय (बौद्ध धर्मीय) आहेत. १२०० वर्षांपूर्वी या लेण्यांची निर्मिती झाली. या लेणी पूर्व दिशेला तोंड करून असल्यामुळे तेथून सूर्योदयाचे सुंदर दर्शन होते. या लेणींमधील ‘चैत्य’ ही लेणी खूप सुंदर आहे. या लेण्यांमध्ये असणाऱ्या बोधिसत्व, गौतम बुद्ध यांच्या मूर्तींना स्थानिक जनता पाच पांडवांच्या मूर्ती समजते. त्यामुळे कदाचित या लेण्यांना पांडव लेणी म्हणत असावेत, असा अंदाज तज्ज्ञ व्यक्त करतात.

**कान्हेरी:** बोरिवली येथे कान्हेरीच्या लेणी वसलेल्या आहेत. इ.स. पू. १ ले शतक ते इ.स. ९ वे शतक या काळात या लेणींची निर्मिती



झालेली आहे. यामध्ये १०९ छोट्या-छोट्या लेणी आहेत. यातील प्रत्येक लेणीला दगडाच्या जोत्यावर उभे



करण्यात आले आहे. या लेणींची एकंदर रचना पाहता येथे बऱ्याच बौद्ध भिक्षूंच्या राहण्याची व्यवस्था केली होती हे लक्षात येते. बेसॉल्ट खडकावर या लेणींची निर्मिती झालेली आहे. बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या परिसरात या लेण्या आहेत. या लेणींच्या पायथ्याशी-सभोवताली दाट जंगल असल्याने येथील थंड हवा, शांतता, निसर्गरम्यता, प्राणिदर्शन आणि शिल्पकला या सर्वांचा आनंद घेण्यासाठी पर्यटक येथे गर्दी करतात.

**कार्ला:** सध्याच्या मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील कार्ला येथे या लेणी आहेत. बौद्ध भिक्षुंनी या लेणी बांधल्या, कोरल्या. इ.स. पू. ३ रे व २ रे शतक या काळात थरवेदा या बौद्ध भिक्षूने लोणावळ्याजवळील निसर्गरम्य भागात या लेणींची निर्मिती केली. भारतात ज्या काही मोजक्या दगड कापून तयार करण्यात आलेल्या लेणी आहेत, त्यात यांचा समावेश होतो. याशिवाय महाराष्ट्रात भाजे (जि. पुणे), जिंतूर (जि. परभणी), बेडसे (जि. पुणे.), हरिश्चंद्र गडावरील केदारेश्वर या ठिकाणी देखील हिंदू, जैन, बौद्ध धर्मीय लेणी आहेत. इतिहासाचा मागोवा घेतला, तर असे लक्षात येते की तत्कालीन राज्यकर्त्यांनी धार्मिक सहिष्णुतेचे धोरण अमलात आणून त्याद्वारे शिल्पकलेच्या विकासाला चालना दिली. अशा या समृद्ध वारशाचे आपण सर्वांनीच जतन करायला हवे.